सर्वोत्तमसंस्थेसाठी कॅनडा येथील कॉमनवेल्थ ऑफ लर्निंगच्या आंतरराष्ट्रीय गुणवत्ता पुरस्कारानेसन्मानित

ज्ञानगंगा घरोघरी

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

गंगापूर धरणाजवळ, गोवर्धन, नाशिक-422222

दूरध्वनी : 0253-2231473, 2231479

संकेतस्थळ : E-mail: coe@ycmou.digitaluniversity.ac

परीक्षा विभाग

जा.क्र. पनिका/ परीक्षा/ 2023/1172 दिनांक: 01/02/2023

अधिसूचना

विषय : जानेवारी 2023 हिवाळी परीक्षा- अंतर्गत गुणदान (CA) आणि (UA) संदर्भात कार्यवाहीबाबत..

संदर्भ : १. पनिका/ परीक्षा /२०२२/ ११०९, दि. १८.१०.२०२२
२. पनिका /परीक्षा /२०२३ /११६४, दि. २०.१.२०२३

उपरोक्त संदर्भीय अधिसूचनेद्वारे अभ्यासकेंद्रांस, माहे जानेवारी २०२३ मध्ये आयोजित केलेल्या हिवाळी सत्र परीक्षेचे अंतर्गत गुण (CA/UA) ऑनलाईन पध्दतीने भरण्याची विहित मुदत दि. २८.१.२०२३ पर्यंत देण्यात आली होती. सदर मुदत संपुष्टात आली आहे. या मुदतीनंतर अभ्यासकेंद्रांकडून मुख्यालयास प्राप्त होत असलेल्या अंतर्गत गुणदान याद्यांमध्ये खालील बाबींची अपूर्णत: असल्याचे दिसून येते. या अनुषंगाने विहित मुदतीनंतर अंतर्गत गुणदान तक्ता सादर करणाऱ्या सर्व अभ्यासकेंद्रांनी खालील बाबींची पूर्तता करणे अनिवार्य राहील याची नोंद घ्यावी.

१. विहित कालावधीत अंतर्गत गुणदान यादी का पाठवू शकले नाही ? याचा अभ्यासकेंद्राच्या लेटरहेडवर खुलासा.
२. विद्यार्थ्याने स्वाध्याय सादर केल्याचा पुरावा.
३. उपस्थिती पत्रक.
४. अभ्यासकेंद्राने स्वाध्यायाची तपासणी करून विहित पध्दतीने गुणदान केल्याचा पुरावा.
५. विहित मुदतीत अंतर्गत गुण सादर न केल्यामुळे दंड भरल्याची पावती.

वरील पूर्ततेशिवाय पाठविलेले अंतर्गत गुण स्वीकारले जाणर नाहीत व यावर कुठलाही पत्रव्यवहार केला जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

(भटूप्रसाद पाटील)
परीक्षा नियंत्रक

प्रति,
1) सर्व अभ्यासकेंद्रे
2) सर्व विभागीय केंद्रे, यचममुवि.